दै. देशोन्नती दि. 31.01.2022

# तामसा ठाण्याचे सपोनि उजगरे यांनी वर्षभरातच गुन्हेगारींवर बसविला अंकुश!

देशोन्नती 31-01-2022

देशोन्नती वृत्तसंकलन...

**तामसा** ■ जिल्ह्यात नावलौकिक असलेल्या तामसा पोलिस ठाण्याला एकापेक्षा एक अशा कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्यांनी कर्तव्य बजावले आहे. त्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक उजगरे यांनी शहर व परिसरातील गुन्हेगारीवर अंकुश मिळवून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत अनेक कामगिरीने सर्वाधिक लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी म्हणून यशस्वी मानले जातात. तामसा पोलिस ठाण्यात रुजू होऊन त्यांना आज एक वर्ष पूर्ण झाले असून त्यांच्या यशस्वी वर्षपूर्तीवर तामसेकरांनी समाधान व्यक्त केले आहे.



मागील एक वर्षांपूर्वी तामसा पोलिस ठाण्यात कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक उजगरे यांची नियुक्ती झाली. एक दबंग पोलिस निरीक्षक म्हणून तामसेकरांनी त्यांचा दरारा अगोदरच ऐकला होताच. धर्माबाद येथे एक धाडसी कारवाई केल्याचे ऐकिवात असल्याने तामस्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर त्यांची सुरुवातीलाच पकड आणि वचक बसली होती. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अशोक उजगरे यांनी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावच्या पोलिस पाटील, शांतता कमिटीच्या वेळोवेळी बैठका घेऊन अनेक समाजाच्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी प्रयत्न केले. सपोनि अशोक उजगरे यांनी तामसा पोलीस ठाण्यात कॉम्प्युटर, मुख्य रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरा बसवून शहर सीसीटीव्हीच्या नजरेत घेतले. गुन्ह्यांची जलद उकल करण्यासाठी विश्वासू विशेष कर्मचारी नेमले. तामसा पोलिस ठाण्याला आयएसओ हे नामांकन मिळविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे उजगरे यांनी सांगितले. तामसा ठाण्यात पोलिस निरीक्षक म्हणून कार्यभार पाहताना सद्रक्षणाय, खलनिग्रहणाय हे ब्रीद वास्तवात उतरवत सर्वसामान्यांशी संपर्क वाढवून गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी प्रयत्न केले. दबंग, कर्तव्यदक्ष, निःस्वार्थी आणि संवेदनशील पोलिस निरीक्षक म्हणून सपोनि उजगरे यांची ओळख आहेच. पण 'पोलिस हाच जनतेचा खरा मित्र', ही संकल्पना राबविल्याने नागरिकांबरोबरच सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये ते लोकप्रिय ठरले आहेत. गणेश विसर्जन, दुर्गा विसर्जन, पोळा, रमजान ईद असो की, कोणतेही धार्मिक, राजकीय, सामाजिक कार्यक्रम असो पहिल्यांदा कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवूनच बाकी मान्यता देणारे अधिकारी म्हणून उजगरे यांची ओळख आहे. काही दिवसांपूर्वी हदगाव, हिमायतनगर तालुक्यातील टाकराळा घाटातील तिहेरी हत्याकांड प्रकरणाचा छडा लावून त्याचा लवकरच पर्दाफाश करणे असो की, गेल्या अनेक वर्षापासून न्यायप्रविष्ट असलेल्या तामसा येथील वादग्रस्त बौद्ध विहार प्रकरणात दोन गटांना एकत्र करून त्यांच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया यशस्वी पार पाडली. पोलिस खात्यात काम करताना कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांचा दबाव येत नसल्यामुळे प्रामाणिक सेवा करून जनतेला न्याय देता येतो. जनतेकडून पोलिसांबद्दल वाढलेले प्रेम हे आपण केलेल्या प्रामाणिक सेवेचे प्रतिक आहे, असे ते बोलतांना म्हणाले. त्यांच्या कर्तव्य कुशलतेने तामसा शहर व परिसरात आजही शांतता व सुव्यवस्था टिकून असल्याने वरिष्ठांचाही त्यांच्यावर गाढ विश्वास असल्याचे अनेक उदाहरणे आहेत, हे विशेष!